# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 08 December 2024

## Time: 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: ०८ डिसेंबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

राज्य विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विधानसभा अध्यक्षपदासाठी महायुतीकडून माजी अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजीत पवार, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची उपस्थिती होती. विधानसभा अध्यक्षपदासाठी आज दुपारी १२ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत होती. ही मुदत संपेपर्यंत राहुल नार्वेकर यांचा एकमेव अर्ज आल्यामुळं त्यांची बिनविरोध निवड होणार असल्याचं स्पष्ट झालं आहे.दरम्यान, पहिल्या दिवशी ईव्हीएम मशीनवर संशय व्यक्त करीत शपथग्रहण समारंभावर बहिष्कार टाकलेल्या महाविकास आघाडीच्या सदस्यांनी आज सदस्यत्वाची शपथ घेतली.

****

सीरियाची राजधानी दमास्कस मध्ये आंदोलनकर्ते दाखल झाल्यानंतर राष्ट्रपती बशर-अल-असद यांनी देशातुन पलायन केले. त्यानंतर आंदोलनकर्त्यांनी राजधानीत जल्लोष साजरा केला. सीरियामध्ये २०११ पासून गृहयुद्ध सुरू असून, पहिल्यांदाच आंदोलनकर्त्यांना मोठं यश मिळालं आहे. या घटनेनंतर लेबनॉन, जॉर्डन देशांनी सीरियासोबत असलेल्या सीमा बंद केल्या आहेत.

****

शितकालीन चारधाम यात्रेला उत्तमराखंडमध्ये आता प्रारंभ झाला आहे. भाविकांना पवित्र चारही धामच्या थंडीतील निवासस्थानी दर्शनाचा लाभ याद्वारे मिळत असतो. महादेवाचं ज्योतिर्लिंग भगवान केदारनाथ यांचं थंडीतील निवासस्थान म्हणजे रूद्रप्रयाग जिल्ह्यातील ऊखीमठचं ओंकारेश्वर मंदिर आहे. इथं मुख्यमंत्री पुष्कार सिंह धामी यांनी या चारधाम यात्रेचं उद्घाटन केलं.

****

मतपत्रिकेवर मतदान घेण्यावरून चर्चेत आलेल्या सोलापूर जिल्ह्यातील मारकडवाडी गावात माजी केंद्रीय मंत्री खासदार शरद पवार यांनी आज भेट देत नागरिकांशी संवाद साधला. यावेळी बोलताना खासदार पवार म्हणाले, नागरिकांना ईव्हीएम मशीन नको असेल तर हट्ट कशासाठी केला जात आहे. अमेरिका, युरोपसह इतर देशांमध्ये मतपत्रीकेवर मतदान घेण्यात येतं. तसंच मारकडवाडी गावातील नागरिक स्वतःच्या मतांची पडताळणी करण्यासाठी मतपत्रिकेवर मतदान घेण्याचा निर्णय घेतल्यास त्यावर प्रशासनानं आक्षेप घेण्याचं काहीही कारण नाही, असेही पवार यांनी यावेळी सांगितलं.

****

राज्यात आगामी २४ तास बहुतांश भागांत प्रामुख्यानं शुष्क अन् कोरडे वातावरण राहणार असल्याची शक्यता भारतीय हवामान शास्त्र विभगानं वर्तवली आहे. तर आज विदर्भाच्या काही जिल्ह्यात पावसाची शक्यता वर्तविण्यात आली असून राज्यातील काही भागात ढगाळ वातावरण आणि हलक्या पावसाची शक्यता आहे.

फेंगल चक्रीवादळाच्या प्रभावानंतर ढगाळ वातावरण निवळून तापमानात पुन्हा गेल्या दोन दिवसांच्या तुलनेत घट झाल्याच पहायला मिळालं. उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांना दक्षिणेकडून येणाऱ्या दमट वाऱ्यांनी थांबवल्यानं अरबी समुद्रात चक्रकार वाऱ्यांमुळे अवकाळी पावसाला पोषक वातावरण तयार झालं होतं. पुढील दोन दिवसातही राज्यात काही भागात हलक्या सरींची शक्यता असली तरी उर्वरित भागात हवामान कोरडे होण्यास सुरुवात झाल्यानं आता राज्यात गारठा वाढणार असल्याची माहिती हवामान विभागानं दिली आहे.

****

राज्याच्या संत परंपरेतील, संताजी महाराज जगनाडे यांची आज जयंती. यानिमित्त मुंबईत मंत्रालयात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं आहे.राज्यभरात विविध भागातील शासकीय कार्यालयांसह सार्वजनिक ठिकाणी जगनाडे महाराजांना अभिवादन करण्यात येत आहे.

****

ऑस्ट्रेलियात ॲडलेड इथं खेळल्या गेलेल्या बॉर्डर-गावस्कर चषक कसोटी क्रिकेट मालिकेचा दुसरा सामना ऑस्ट्रेलियानं एकहाती जिंकला. दिवस-रात्र स्वरुपात गुलाबी चेंडुचा वापर झालेल्या या कसोटीत आज चौथ्या दिवसाचा खेळ सुरु झाला तेव्हा भारतानं आपल्या दुसऱ्या डावात, काल दिवस अखेरच्या पाच बाद १२८ धावांवरुन पुढे खेळायला सुरुवात केली. आणि सर्वबाद १७५ धावा करत भारताला

फक्त १८ धावांचीच आघाडी घेता आली. ऑस्ट्रेलीयानं बिनबाद १९ धावा करत हा विजय मिळवला. ऑस्ट्रेलीयाचा फलंदाज ट्रॅव्हीस हेड सामनावीर किताबाचा मानकरी ठरला. उभय संघांनी या पाच सामन्यांच्या मालिकेत प्रत्येकी एक सामना जिंकला आहे. आता तिसरा सामना येत्या १४ डिसेंबरपासून खेळला जाईल.

****

संयुक्त अरब अमिरातीच्या, दुबई इथं आयोजित १९ वर्षाखालील पुरुषांच्या एकदिवसीय क्रिकेट समन्यांच्या आशिया चषक स्पर्धेत भारत–बांग्लादेश दरम्यान अंतिम सामना सध्या सुरु आहे. नाणेफेक जिंकून भारतानं क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. शेवटचं वृत्त आलं तेव्हा बांग्लादेशनं ३१ षटकांत तीन बाद ११९ धावा केल्या होत्या.

****

ओमानच्या मस्कतमध्ये महिलांच्या कनिष्ठ गट अशिया कप हॉकी स्पर्धेत आज, भारत–बांग्लादेश सामना होणार आहे. या स्पर्धेचा गतवेळचा विजेता भारतीय संघ गट अ मध्ये असून चीन, मलेशिया आणि थायलंडसोबतही भारताचे सामने होत आहेत. गट ब मध्ये दक्षिण कोरिया, जपान, चीनी तैपेई, हाँगकांग आणि श्रीलंका या संघांचा समावेश आहे.

या स्पर्धेतुनच पुढील वर्षी चिलीमध्ये होणार असलेल्या एफआयएच कनिष्ठ गट विश्वचषक स्पर्धेसाठी पात्र ठरणाऱ्या संघाची निवड होणार आहे.

****